महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

रविवार ❖ २ फेब्रुवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २१८ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# केंद्रीय अर्थसंकल्प सादर

## निर्मला सीतारामन यांनी सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन (1 फेब्रुवारी 2025) देशाचा अर्थसंकल्प मांडला. निर्मला सीतारामन यांनी सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादर केला.

केंद्र सरकारच्या 2025 च्या अर्थसंकल्प मांडताना गरीब, तरुण, महिला आणि शेतकरी यांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले जाईल, असं नमूद केलं. तसेच शेतकऱ्यांसाठी देखील मोठ्या घोषणा करण्यात आल्या. निर्मला सीतारामन यांनी शेतकऱ्यांसाठी धनधान्य योजना आणणार असल्याचं जाहीर केलं. किसान क्रेडिटकार्डची मर्यादा 3 लाखांवरुन 5 लाखांवर केली जाणार अशी घोषणा निर्मला सीतारामन यांनी यावेळी केली.

केंद्र सरकारच्या 2025-26 च्या अर्थसंकल्पात काय स्वस्त आणि काय महाग झालंय, पाहा संपूर्ण यादी...

### 2025-26 च्या अर्थसंकल्पात काय स्वस्त?

- LED-LCD च्या किंमती कमी होणार
- टीव्हीचे पार्ट्स स्वस्त होणार
- मोबाईल स्वस्त होणार
- मोबाईलच्या बॅटरीसंदर्भातील 20 भांडवली वस्तूंना सूट
- कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी 56 औषधं कस्टम ड्युटी फ्री
- लिथियम बॅटरीत लागणारी कोबाल्ट पावडर
- भारतात तयार होणार कपडे स्वस्त होणार
- चामड्यांपासून बनवलेल्या वस्तू स्वस्त होणार
- गोठवलेल्या माशांच्या पेस्टवरील मूलभूत सीमाशुल्क 30% वरून 5% पर्यंत कमी करणार

### 2025-26 च्या अर्थसंकल्पात महाग काय?

- इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनेल डिस्प्लेवरील सीमाशुल्कात वाढ
- फॅबरिक (Knitted Fabrics)
- बऱ्याच आवश्यक वस्तूंवर सीमाशुल्क कमी किंवा सूट दिली जाणार आहे. परंतु काही वस्तू महाग होणार आहेत, विशेषतः तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात.

### मोदी सरकारची मोठी घोषणा
### कोणत्या उत्पन्न गटाला किती टॅक्स?

0 ते 4 - Nil
4 ते 8-5 टक्के
8 ते 12 लाख - 10 टक्के
12 ते 16 लाख - 15 टक्के
16 ते 20 लाख - 20 टक्के
20 ते 24 लाख - 25 टक्के
24 लाखापुढे - 30 टक्के

### 2024-25 च्या अर्थसंकल्पात काय स्वस्त झालं होतं?

सोनं, चांदी सोनं-चांदीवर 6.5 टक्के ऐवजी 6 टक्के आयात कर, मोबाईल हँडसेट, मोबाईल चार्जरच्या किमती , मोबाईलचे सुटे भाग, कॅन्सरवरची औषधे, पोलाद, तांबे उत्पादनावरील प्रक्रियेवर करसवलत, लिथियम बॅटरी ,इलेक्ट्रीक वाहने, सोलार सेट, चामड्यांपासून बनणाऱ्या वस्तू, विजेची तार

### 2024-25 च्या अर्थसंकल्पात काय महाग झालं होतं?


प्लास्टीक उद्योगांवर कर, प्लास्टीक उत्पादने, सिगारेट, विमान प्रवास , पीव्हीसी फ्लेक्स शीट, मोठ्या छत्र्या

### 2025-26 च्या अर्थसंकल्पामधील मोठे निर्णय -

- डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी विशेष योजना -पुढील 6 वर्षे तूर, मसूर आणि इतर डाळींच्या उत्पादनावर भर
- कापसाच्या उत्पादनासाठी 5 वर्षांचे मिशन - यामुळे देशातील वस्त्र उद्योगाला चालना मिळणार
- किसान क्रेडिट कार्डवरील कर्ज मर्यादा ₹3 लाखांवरून ₹5 लाखांपर्यंत वाढवली
- बिहारमध्ये मखाना बोर्ड स्थापन छोट्या शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना फायदा
- लघुउद्योगांसाठी विशेष क्रेडिट कार्ड योजना पहिल्या वर्षी 10 लाख क्रेडिट कार्ड जारी केली जाणार



## केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळालं?



भारताच्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील अर्थसंकल्प सादर केला. यावेळी निर्मला सीतारमन यांनी 12 लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केली

त्यामुळे 12 लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न असलेल्यांना मोठा दिलासा मिळाला. तसेच अर्थमंत्री म्हणून आठव्यांदा अर्थसंकल्प मांडताना निर्मला सीतारमन यांनी विविध क्षेत्रांसाठी भरभरून आर्थिक तरतुदी केल्या. यावेळी त्यांनी उद्योग, आरोग्य, तंत्रज्ञान, कृषी क्षेत्रासाठी अनेक मोठ्या तरतुदी केल्या. या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांसाठी अनेक मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या. तसेच गंभीर आजारावरील 36 औषधे ड्युटी फ्री केली. निर्मला सीतारमन यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात विविध राज्यांसाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या. मात्र हा अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर विरोधकांकडून महाराष्ट्रासाठी काय तरतुदी करण्यात आल्या असा सवाल उपस्थितीत केला जात आहे. आता यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी नुकतंच एक ट्वीट केले आहे. यात त्यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले, याबद्दलची संपूर्ण आकडेवारी सांगितली आहे.

देवेंद्र फडणवीसांचे ट्वीट केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्र।
(टिप: ही केवळ प्राथमिक माहिती. विविध मंत्रालयांची तरतूद तसेच रेल्वेची आकडेवारी सविस्तरपणे येईल.)
- मुंबई मेट्रो : 1255.06 कोटी - पुणे मेट्रो : 699.13 कोटी - एमयुटीपी : 511.48 कोटी - एमएमआरसाठी एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधा: 792.35 कोटी - मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे: 4004.31 कोटी - सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : 1094.58 कोटी - महाराष्ट्र ग्रामीण जोडसुधार प्रकल्प: 683.51 कोटी - महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क : 596.57 कोटी - नागनदी सुधार प्रकल्प : 295.64 कोटी - मुळा-मुठा नदी संवर्धन : 229.94 कोटी - ऊर्जा कार्यक्षम उपसा सिंचन प्रकल्प: 186.44 कोटी, असे ट्वीट देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

# ठाण्याच्या अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : 'माझ्या नजरेतून ठाणे' या उपक्रमांतर्गत गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाच्याही अर्थसंकल्पात आखणीत नागरिकांच्या सुचनांचा समावेश करण्याचा निर्णय ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी घेतला आहे. या निर्णयानुसार, अर्थसंकल्पाकरीता नागरिकांना सूचना पाठवण्याचे आवाहन त्यांनी केले असून यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पातही नागरिकांच्या सुचनांना स्थान मिळण्याची चिन्हे आहेत.




एखादी समस्या असेल तर तिचा पाठपुरावा करून ती समस्या सोडवण्यासाठी प्रशासनास लोकप्रतिनिधींचे सहकार्य मिळते. माध्यमांचे प्रतिनिधीही वेळोवेळी बातम्यांमधून किंवा प्रत्यक्ष भेटून विविध मुद्दे निदर्शनास आणून देतात. यासोबतच नागरिकांची मते जाणून घेण्याची गरज असल्याने 'माझ्या नजरेतून ठाणे’ हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय तत्कालीन ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी थेट नागरिकांशी संवाद साधून त्यांची शहराबद्दलची मते जाणून घेत त्याचा अर्थसंकल्पात अंतर्भाव केला होता. हा उपक्रम पुढे विद्यमान आयुक्त सौरभ राव यांनी पुढे सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

ठाणे महापालिकेचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू झाली आहे. यासाठी आधीच्या अर्थसंकल्पाचा आढावा घेण्यात येत आहे. तसेच, शहराच्या नियोजनाच्या दृष्टीने भविष्यातील योजना, आवश्यकता यांची आखणी केली जात आहे. या आखणीत ठाणेकरांच्या सुचनांचा अंतर्भाव केला जाणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पाकरीता नागरिकांना सूचना पाठवण्याचे आवाहन आयुक्त राव यांनी केले आहे. ज्या नागरिकांना सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाविषयी काही सूचना मांडायच्या असतील त्यांनी, शनिवार ८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत आपल्या सूचना cafo@thanecity.gov.in या इमेल आयडीवर पाठवाव्यात. त्याशिवाय, मुख्य लेखा विभाग, दुसरा मजला, महापालिका मुख्यालय, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, ठाणे (प.) ४००६०२ या पत्त्यावर लेखी स्वरुपातही पाठवता येतील, अशी माहिती ठाणे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी यांनी दिली आहे.




# जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना गावभेटी द्याव्या लागणार

## - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांना आठवड्याला गावभेटी द्याव्या लागणार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आदेश

शिर्डी दि. १- मंत्र्यांपाठोपाठ आता अधिकाऱ्यांनाही जनतेत जाऊन काम करावे लागणार आहे. जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनी दर आठवड्याला गावभेटी देत शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

वेगवान कारभारासाठी महसूल विभागाकडून महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. महसूल विभागाकडून ११ कलमी परिपत्रक जाहीर करण्यात आले असून या परिपत्रकातील ११ कलमी मुद्दे पुढील प्रमाणे सदर भेटी दरम्यान क्षेत्रीय कार्यालयांचे कामकाज यादृच्छिकरित्या व अचानक तंत्राचा वापर करुन तपासावे. सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या पार पडत आहे याची सकारात्मक खातरजमा करावी. यात केवळ औपचारिकता न ठेवता क्षेत्रीय यंत्रणेवर नियंत्रण राहील असे नियोजन करावे.

दौऱ्यामध्ये सकारात्मक फलित निघेल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. ग्रामपातळीवरील लोकांशी सुसंवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात व त्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करावेत. संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची सर्वसामान्यांशी वागणूक सौजन्यपूर्ण व संवेदनशीलतेची आहे, याबाबत जनसंवादातून खात्री करावी. गावपातळीवरील तसेच इतर अधिकारी,



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्री, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना जनतेत जाण्याबाबत जे परिपत्रक काढले आहे. त्यामुळे जनता व अधिकारी यांच्यात संवाद निर्माण होईल.
- भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा संयोजक, भाजपा, सोशल मीडिया सेल, उत्तर नगर,

कर्मचारी नियमानुसार कार्यक्षेत्रात राहून आपले कर्तव्य निभावत असल्याची खात्री करावी.

गौण खनिज व महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी नाविन्यपुर्ण संकल्पना राबविणे. तसेच वाळू व गौण खनिज उत्पन्न तपासणी शासकीय धोरणानुसार अंमलबजावणी होत असल्याची खातरजमा क्षेत्रीय भेटी दरम्यान करावी.

क्षेत्रीय भेटी देवून नैसर्गिक आपत्तीप्रवण भागात भविष्यात आपत्ती कशी टाळता येईल याच्या उपाययोजना, भौगोलिक व स्थानिक परिस्थिती विचारात घेवून काय उपाययोजना करता येईल ? याबाबत वेळोवेळी त्या त्या मंत्रालयीन विभागास सुचित करुन जिल्हा, उपविभागीय तसेच तालुका पातळीवरील त्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचित करुन कामे करुन घ्यावीत.

मुख्यमंत्री महोदयांनी १०० दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने महसुली विभागास दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत असल्याचा वेळोवेळी आढावा घ्यावा. सर्व कार्यालयांमध्ये कामकाज प्राधान्याने e-Office प्रणालीमध्ये होत आहे का याची तपासणी करावी.

सेवा हक्क कायदा पोर्टल, आपले सरकार पोर्टल, पी.जी. पोर्टल, पी. एम. जी पोर्टल, e-mutation, ई-पिकपाणी, e.Qj court इत्यादी ऑनलाईन सुविधेमधील क्षेत्रीय कार्यालयाच्या कामकाजास अनुसरून निर्गतीचा आढावा घ्यावा. सेतु कार्यालयाची तपासणी करावी व आवश्यक त्या सुचना संबंधितांना कराव्यात.


कार्यालयांची तपासणी करत असताना कार्यालयीन इमारतीतील स्वच्छता, सुविधा इत्यादीची तपासणी करावी. कार्यालयाच्या समोर कार्यालयाचे नाव दर्शविणारे दर्शनीय व सुस्पष्ट नामफलक असल्याची तसेच नागरिकांची सनद, जनतेसाठी त्या कार्यालयामार्फत उपलब्ध होणाऱ्या सुविधा व संपर्क क्रमांक हे त्या-त्या कार्यालयासमोर लावण्यात आल्याची खात्री करावी.

## भारतीय राज्यघटनेमुळेच
# देशाची 'शक्तिशाली राष्ट्र' म्हणून ओळख

## - प्रा.राम शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जागतिक स्तरावर भारताने एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख प्राप्त केली आहे. आपल्या राज्यघटनेने त्यादृष्टीने भक्कम आधारशिला प्राप्त करून दिली असल्यानेच हे शक्य झाले. लोकशाही संस्था बळकट करणे,सकारात्मक सहभाग नोंदवून संसद आणि राज्य विधानमंडळे यांचे वैभव टिकवणे आणि त्यायोगे लोक कल्याणाच्या प्रति प्रतिबद्धता सुनिश्चित करणे हे, आपले कर्तव्य आपण चोखपणे बजावले पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले.लोकसभा अध्यक्ष श्री ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली येथे आयोजित ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत ते बोलत होते. " भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे:घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद आणि राज्य विधान मंडळे यांचे योगदान" या विषयावर या परिषदेमध्ये विचारमंथन होत आहे.



आपले विचार व्यक्त करतांना सभापती प्रा.राम शिंदे पुढे म्हणाले,आपली राज्यघटना पुरेशी लवचिक असून ती दिनप्रतिदिन आणखी सामर्थ्य प्राप्त करीत आहे. आपल्या संसदीय लोकशाहीने राज्यघटनेच्या या शक्तिमुळेच समोर आलेल्या संकटांचा यशस्वी सामना केला.घटना दुरुस्तीच्या संदर्भात काहींनी हेतूता गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न केले मात्र अलीकडच्या निवडणुकांमध्ये जनतेने त्यांना नाकारून योग्य जनादेश दिला आहे.

"लोकशाहीत स्वातंत्र्य,समता आणि बंधुता या तीन मूल्यांना अत्यंत महत्त्व आहे.एकाला सोडून

दुसऱ्याचा विचार देखील करता येणार नाही.तसे झाल्यास लोकशाही संदर्भातील मूळ संकल्पनेलाच बाधा पोहोचेल..." या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना परिषदेसमोर दिलेल्या भाषणातील सावधानतेकडे सभापती प्रा.राम शिंदे यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले आणि सर्वांनी या मुल्यांप्रती कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

सर्वसमावेशिता आणि सर्वांना समान संधीची उपलबधता हे आपल्या राज्यघटनेचे महत्वाचे वैशिष्ट्य त्यांनी यावेळी अधोरेखित केले.कोणतीही राजकीय,आर्थिक अशी कौटुंबिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून पुढे आलेले आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी हे आपल्या उल्लेखनीय कार्यकर्तृत्वाच्या आधारावर तिसऱ्यांदा योगदान देत देशाला विकासाच्या वाटेवर पुढे नेत आहेत. हे स्वयंस्पष्ट उदाहरणच यासंदर्भात पुरेसे आहे असेही सभापती प्रा. राम शिंदे यावेळी म्हणाले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसदीय कारकीर्दीचा प्रारंभ तेव्हाच्या बॉम्बे लेजिस्लेटिव्ह काऊन्सिल सदस्यत्वापासून झाला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

आपल्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाद्वारे लोककल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्यांनी यावेळी कृतज्ञ स्मरण केले.

# गीतासार



अथ चैनं नित्यजातं नित्यं
वा मन्यसे मृतम् ।
तथापि त्वं महाबाहो नैवं
शोचितुमर्हसि ॥२- २६॥

परंतु, जर तू आत्मा नेहमी जन्माला येणारा व नेहमी मरणारा आहे, असे मानत असशील, तरीसुद्धा हे महाबाहो, तू अशा रीतीने शोक करणे योग्य नाही. ॥ २-२६ ॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं
जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं
शोचितुमर्हसि ॥२- २७॥

कारण असे मानल्यास त्यानुसार जन्मास आलेल्याला मृत्यू निश्चित आहे आणि मेलेल्याला जन्म निश्चित आहे. म्हणून या उपाय नसलेल्या गोष्टींविषयीही तू शोक करणे योग्य नाही. ॥ २-२७ ॥

अव्यक्तादीनि भूतानि
व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र
का परिदेवना ॥२- २८॥

हे अर्जुना, सर्व प्राणी जन्मापूर्वी अप्रकट असतात आणि मेल्यानंतरही अप्रकट होणार असतात. फक्त मध्ये प्रकट असतात. मग अशा स्थितीत शोक कसला करायचा. ॥ २-२८ ॥

## आरोग्य टिप्स

### पांढरा सुका मेवा मखाना



आरोग्यदायी आणि चविष्ट बनवण्यासाठी भाजलेला मखना हा अधिक चांगला पर्याय ठरू शकतो. माखना खूप निरोगी आहेत. त्यामध्ये खूप कमी कॅलरी असतात, त्यामुळे वजन कमी करण्यासाठी ते खाणे फायदेशीर ठरू शकते. याव्यतिरिक्त, ते अनेक प्रकारच्या पोषक तत्वांनी समृद्ध आहेत.

मखना अनेक प्रकारच्या पोषक तत्वांनी समृद्ध आहे. प्रथिने, फायबर, हेल्दी फॅट्स, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांसारखे पोषक घटक त्यात आढळतात. पोषक तत्वांनी युक्त मखना हा एक उत्तम नाश्ता पर्याय आहे.

प्रथिने आणि फायबरने समृद्ध मखनाचे सेवन वजन नियंत्रित करण्यास आणि पोटावरील चरबी कमी करण्यास मदत करते. मखानामध्ये आर्जिनिन, ग्लूटामाइन, मेथिओनाइन आणि सिस्टीन यांसारख्या अमीनो ॲसिडचे प्रमाण भरपूर आहे. हे सर्व अँटी-एजिंग गुणधर्म त्वचेला तरुण आणि सुंदर बनवतात.

तुपात भाजलेला माखणा हाडांसाठी खूप फायदेशीर आहे. हे खाल्ल्याने ऑस्टिओपोरोसिसची समस्या टाळण्यासही मदत होते . त्यात कॅल्शियम देखील असते, जे हाडांसाठी आणि दातांसाठी फायदेशीर आहे.


तेथे कर माझे जुळती

# उमाजी नाईक पुण्यस्मरण

## (७ सप्टेंबर १७९१ - ३ फेब्रुवारी १८३२)

छत्रपती शिवरायांचा आदर्श समोर ठेवणारे व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रथम सशस्त्र क्रांती कारक नरवीर देशभक्त , उमाजी नाईक यांनी ब्रिटिशांशी कशी झुंज दिली ते अभ्यासणे स्फूर्तिदायक ठरेल असे वाटते . पुणे जिल्ह्यांतील पुरंदर तालुक्यातील भिवडी गावी उमाजी नाईक यांचा जन्म 7 सप्टेंबर 1791 या दिवशी झाला . त्यांच्या वडिलांचे नाव दादोजी नाईक (खोमणे) आणि आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. रामोशी अथवा बेरड समाजात ते जन्मले . त्यांच्या वडिलांनी त्यांना लहानपणा पासूनच दांडपट्टा , तलवार चालवणे , भालाफेक ,कुऱ्हाडी तीर कामठा गोफण वगैरे चे प्रशिक्षण दिले .पार्श्वभूमी अशी आहे की ब्रिटिशांनी रामोशी समाजाच्या लोकांची वतने रद्द केली . त्या रागातून उमाजी नाईक यांच्या आधी संतू नाईक यांनी रामोशी समाजाचे नेतृत्व केले . उमाजी नाईक यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना साथीला घेऊन दरोडे घालण्यास सुरुवात केली . सन 1818 मध्ये उमाजींनी भोर जवळील विंग गावात दरोडा टाकला. तेव्हा ब्रिटिशांनी त्यांना पकडले आणि तुरुंगात त्यांची अक्षरओळख झाली. पुढे तब्बल 14वर्षे त्यांनी ब्रिटिशांशी लढा दिला .

उमाजी नाईक यांनी इंग्रजांच्या वाढत्या आक्रमणा विरोधात एक जाहीरनामा घोषित केला



. इंग्रज शिपाई अथवा लष्करी अधिकारी ज्या ज्या ठिकाणी दिसेल त्या त्या ठिकाणी त्याला खलास करा . सदर काम करणाऱ्या शुर वीरास रोख रक्कम , इनामे जहागिरी देण्याचे फर्मान काढले . ज्यांच्या मिळकती लुटल्या असतील त्या परत मिळवून दिल्या जातील . तसेच इंग्रजांच्या सैन्यात कोणीही नोकरी करू नये . इंग्रजांचे । साहेबांचे हुकूम पाळू नयेत . त्यांच्या मालमता जाळाव्यात , सरकारी तिजोऱ्या लुटाव्यात . उमाजी नाईक यांची पुणे, नाशिक , नगर व भोर ह्या भागात खूप दहशत होती . गरीबांना त्रास देणाऱ्या जमीनदार , सावकार व इंग्रज त्यांना थरथर कापत असत . गोरगरीबांना ते संकट काळी मदत करत . गरीब मुलामुलींची लग्ने लावून देत. त्यांना सणासुदीला गोडधोड खायला देत. त्यांना गरीबांचा देवदूत व दुष्टांचा कर्दनकाळ म्हणून प्रसिद्धी मिळाली होती .

दिनांक 28 ऑक्टोबर 18 26 रोजी उमाजी नाईक यांच्या विरूद्ध पहिला जाहीरनामा प्रसिद्ध केला . उमाजीराजे व त्यांच्या साथीदारांना पकडणाऱ्यांना बक्षिसे व इनाम जाहीर केले .पण जनतेने इंग्रजांना मदत केली नाही म्हणून त्यांनी दुसरा जाहीरनामा प्रसिद्ध केला . लगेच 30 नोव्हेंबर 1827 रोजी तिसरा जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यानुसार बक्षिस रक्कम दुप्पट केली . 5000 रुपये बक्षिस आणि 200 बिघे (100 एकर) जमीन उमाजी नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांना देण्याचे ब्रिटीशांनी जाहीर केले. कारण 20 डिसेंबर 1827 रोजी झालेल्या युद्धात इंग्रजांचा पराभव करून उमाजी राजे यांनी तीन इंग्रज सैनिकांची मुंडके कापून मामलेदार कडे पाठवली. म्हणून इंग्रज धास्तावले . तत्कालीन ब्रिटीश अधिकारी कॅप्टन डेव्हिस पासून ते सर्वच संतापले .

अशाप्रकारे 1826 ते 1832 च्या सुमारास भारतातील ब्रिटीश राजवटीला आव्हान भारत मातेचा सुपुत्र उमाजी नाईक यांनी दिले. भारताच्या इतिहासातील एक सुवर्णपान समजले जाते .

शेवटी उमाजी नाईक यांना पकडण्यासाठी ब्रिटिश सरकारने 10000 रूपयांचे इनाम जाहीर केले . नाना रघु चव्हाण नावाच्या रामोशीने विश्वासघात केला आणि उमाजी राजे नाईक यांना निःशस्त्र अवस्थेत ब्रिटिशांनी कॅप्टन अलेक्झांडर मॅकिंटॉश च्या नेतृत्वाखाली अटक केली .चौकशी करून त्यांना दोषी ठरवण्यात आले .त्यांच्या दोन साथीदारांसह फाशी ची शिक्षा सुनावली . 3 फेब्रुवारी 1832 रोजी त्यांना फासावर लटकवण्यात आले . ब्रिटिशांचा कर्दनकाळ , खंडोबाचा निष्ठावंत भक्त , इतिहासात पहिला संघटित सशस्त्र क्रांती व उठाव करणारा देशभक्ताचा अस्त झाला . त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# आरोग्यदायी मोदक पाककला

## फोर्टिस हॉस्पिटल, कल्याण येथील क्लिनिकल डाएटीशियन सुमैया ए. यांचा लेख

माघी गणेशोत्सव सारख्या सणांदरम्यान गोड पदार्थ व इतर मिष्टान्नांचा मनसोक्त आस्वाद घेतला जातो. पण, आरोग्याबाबत जागरूक असलेल्या किंवा मधुमेहासारख्या आजारांनी पीडित असलेल्या व्यक्ती गोड पदार्थांचे सेवन करण्याबाबत काळजी घेतात. आरोग्यासंदर्भात या मर्यादा पाहता विद्यमान पाककलांमध्ये बदल करणे आणि गोड पदार्थांऐवजी आरोग्यदायी पर्यायांना प्राधान्य देणे उत्तम आहे.

आम्ही कॅलरी सेवनावर नियंत्रण ठेवण्यासोबत सणासुदीच्या काळाचा आनंद घेऊ पाहणाऱ्यांसाठी दोन खास आणि सोप्या मोदक पाककलांची निवड केली आहे.

आरोग्यदायी मोदक: या पौष्टिक मोदकामध्ये प्रोटीन, फायबर, आरोग्यदायी फॅट्स संपन्न प्रमाणात असून ओट्स, बदाम, फ्लेक्ससीड्स, बिया, खजूर व नट्समधील आवश्यक पौष्टिक घटक असतात. हे मोदक खास प्रसंगांसाठी स्वादिष्ट व पौष्टिक ट्रीट आहेत.

**सामग्री:**

**बाहेरील आवरणासाठी**

- १ कप ओट्स पीठ (ओट्सचे मिश्रण करून तयार केलेले)
- अर्धा कप बदाम पीठ किंवा शेंगदाण्याची पावडर
- २ चमचे फ्लेक्ससीड्स पीठ



- चिमूटभर मीठ
- गरजेनुसार पाणी

**सारणासाठी**

- अर्धा कप खजूर (कोमट पाण्यात भिजवलेले)
- अर्धा कप मिक्स बिया (भोपळ्याच्या बिया, सुर्यफूलाच्या बिया, कलिंगडाच्या बिया)
- अर्धा चमचा वेलची पावडर

**कुकिंग कृती:**

- बाहेरील आवरणासाठी एका भांड्यामध्ये ओट्सचे पीठ, बदामांचे पीठ, फ्लेक्ससीड पीठ आणि चिमूटर मीठ घ्या, त्यामध्ये हळूहळू पाणी टाका आणि मिश्रण करत पीठाचा गोळा तयार करा.
- पीठाचा गोळा १० ते १५ मिनिटे ठेवा.
- भिजवत ठेवलेले खजूर घ्या आणि सारणासाठी त्यांचे मिश्रण करून पेस्ट तयार करा. गरजेनुसार पाणी टाकू शकता.
- दुसऱ्या भांड्यामध्ये बियांचे मिश्रण तयार करा.
- सारण तयार करण्यासाठी खजूराची पेस्ट, मिश्रित बिया आणि वेलची पावडर मिक्स करा.
- मोदक तयार करण्यासाठी ओट्स-बदाम व शेंगदाण्याच्या पीठाच्या गोळ्यामधून थोडेसे पीठ घेत मोदकाचा आकार तयार करा.
- मध्यभागी चमचाभर तयार केलेले सारण भरा.
- कडा एकत्र करत मोदकाचा आकार तयार करा. सर्व बाजू योग्यरित्या बंद करण्याची काळजी घ्या.
- उर्वरित पीठासह ही प्रक्रिया पुन्हा करा. जवळपास १० ते १५ मिनिटे स्टीमरमध्ये मोदकांना वाफ द्या.
- थोडेसे थंड झाल्यानंतर मोदक सर्व्ह करा.

**गाजराचे मोदक:**

हे मोदक देखील पौष्टिक व आरोग्यदायी असतात, कारण गाजरांमध्ये व्हिटॅमिन ए संपन्न प्रमाणात असते. शिजवलेले गाजर अधिक पौष्टिक असतात, दृष्टीसाठी चांगले असतात, तसेच त्यांच्यामध्ये अँटीऑक्सिडण्ट्स गुणधर्म असण्यासोबत बीटा-कॅरोटीन उच्च प्रमाणात असते. बदाम व काजू यांसारख्या नट्समध्ये आरोग्यदायी फॅट्स असतात, तर दूध व मिल्क पावडर प्रोटीन व कॅल्शिअमची भर करतात. सर्वोत्तम भाग म्हणजे, हे मोदक आरोग्यदायी असण्यासोबत सहजपणे तयार करता येतात, तसेच तयार करण्यासाठी कमी वेळ लागतो.

**सामग्री:**

बाहेरील आवरणासाठी

- गाजर - १ कप
- दूध - अर्धा कप
- मिल्क पावडर - अर्धा कप
- गूळ - पाव कप
- बदाम (कापलेले - १ चमचा)
- काजूची पावडर (३ चमचे)
- वेलची पावडर - पाव चमचा
- तूप - १ चमचा

**सारणासाठी**

कापलेले मिक्स नट्स (शेंगदाणे, पिस्ता, अक्रोड) - पाव कप

**कुकिंग कृती:**

- एका तव्यामध्ये तूप घ्या. तूप वितळल्यानंतर किसलेले गाजर टाका आणि मिक्स करा.
- आता, मिल्क पावडर किंवा दूध टाका आणि गाजर पूर्णपणे शिजेपर्यंत ढवळा. हळूहळू काजूची पावडर, कापलेले बदाम, गूळ व वेलची पावडर टाका. ते योग्यरित्या मिसळण्याची काळजी घ्या.
- मिश्रण सुकेपर्यंत शिजवा. त्यानंतर, मिश्रण पूर्णपणे थंड होण्यासाठी ठेवा.
- मोदकाचा साचा घ्या, त्यावर तूप लावा आणि मध्यभागी मिश्रण टाका. मोदकाच्या सर्व बाजू बंद असण्याची खात्री घ्या.
- मोदक साच्यामधून काढा आणि सर्व्ह करा.

# टिटवाळा महागणपती मंदिरात गणेश भक्ताची मांदियाळी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टिटवाळा येथील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक महागणपती मंदिरात माघी गणेश जयंतीनिमित्त हजारो गणेश भक्तांची मांदियाळी आपल्या लाडक्या बाप्पाच्या दर्शनासाठी झाली होती. गणेश जयंती उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पहाटे चार वाजता चंदन, जल, दूध आणि पंचामृताने गणरायाचा अभिषेक करण्यात आला. दुपारी बारा वाजून तीस मिनिटांनी मंत्रघोष आणि भक्तांच्या जल्लोषात गणेश जन्मोत्सव पार पडला.

भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. चंदन, फुले आणि दागिन्यांनी बाप्पाची आकर्षक सजावट करण्यात आली होती. सोहळ्यानंतर "गणपती बाप्पा मोरया"च्या गजराने मंदिर परिसर दणाणून गेला. आरतीनंतर मंदिर समितीतर्फे महाप्रसाद वाटप झाले, तर संतोष जोशी यांच्या वतीने अन्नदान सेवा आयोजित करण्यात आली.

गणेश जयंतीनिमित्त ३ फेब्रुवारीपर्यंत मंदिरात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. त्यात कीर्तन, भजन, प्रवचन, भक्तिसंगीत आणि अर्ध्यदीप पूजन यांचा समावेश आहे. आज संध्याकाळी चार वाजता भव्य पालखी मिरवणूक सोहळा सुरु झाला. या पालखी सोहळयास स्थानिक पंचक्रोशीतील कोळीबांधव तसेच उरण कारंजा परिसरातील कोळी बांधवाचा सहभाग लक्षणीय होता. पालखी सोहळ्यासाठी गणेश भक्ताची गर्दी झाली होती.

टिटवाळा महागणपती मंदिरातील हा सोहळा दरवर्षी भक्तांना एकत्र आणतो. यंदाही हजारो भाविकांनी भक्तीमय वातावरणात सहभागी होत हा उत्सव अधिक भव्य केला. श्रद्धा आणि भक्तीच्या या सोहळ्याची अनुभूती प्रत्येक गणेशभक्तासाठी अविस्मरणीय ठरली.

# कुर्ला येथे भीषण आग

## भंगार दुकाने जळून खाक


मुंबईः कुर्ला पश्चिम येथील भंगार दुकानांना शनिवारी सायंकाळी लागलेल्या भीषण आगीत दुकाने जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झालेली नाही. कुर्ला (पश्चिम), कुर्ला खाडी, इक्विनॉक्स बिल्डिंगजवळ भंगार दुकानात आग लागण्याची घटना शनिवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीत दुकानातील भंगार सामान मोठ्या प्रमाणात जळाले. ज्वालाग्राही वस्तूंमुळे आग काही वेळात भडकली. या आगीची माहिती मिळताच आजूबाजूची घरे, दुकाने तात्काळ रिकामी करण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी मदतकार्य युद्धपातळीवर हाती घेतले. मात्र भंगार सामानात लाकूड सामान, ज्वलनशील घटक असल्याने आग जास्तच भडकली. त्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांनी आग स्तर -२ ची असल्याचे सायंकाळी चार वाजून ४५ मिनिटांनी जाहीर केले. आगीवर सायंकाळी उशिरा नियंत्रण मिळवता आले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झालेली नाही. मात्र आग का आणि कशी काय लागली याबाबत अग्निशमन दलाचे जवान आणि स्थानिक पोलीस अधिकारी अधिक माहिती घेऊन तपास करीत आहेत.

# 'सुकून' कौटुंबिक कलह सामंजस्याने मिटविण्याचे एक पाऊल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई जिल्हा न्यायालयात सुकून प्रकल्पाचे उद्घाटन आज करण्यात आले. या सुकून प्रकल्पामुळे कायद्याच्या कक्षेत राहून कौटुंबिक खटले दोन्ही पक्षांच्या सामंजस्याने मिटवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विशेष म्हणजे हि सेवा पूर्ण मोफत आहे. या प्रकल्प उद्घाटन प्रसंगी न्यायाधीश रचना तेहरा आणि प्रकल्प प्रमुख डॉ. अपर्णा जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

अनेकदा क्षुल्लक वाद, समोरच्या व्यक्तीला नामोहरम करण्याची जिद्द



, अपमानाचा बदला, अशा अनेक कारणांनी न्यायालयात धाव घेतली जाते. यात सर्वाधिक पती पत्नीतील वादाचा समावेश होतो. हे कौटुंबिक वाद न्यायालयात येण्यापूर्वी आप आपसातच मिटावे व वादाचे रूपांतर संवादात व्हावे यासाठी कौटुंबिक न्यायालय बेलापूर याठिकाणी सुकून प्रकल्प सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. कौटुंबिक वाद अनेकदा "इगो" भोवती फिरणारे असतात. त्यामुळे दोन्ही पक्षांचे ऐकून घेणे त्यांचे मन मोकळे होऊ देणे, न्यायालयीन लढाईत होणारे परिमाम आदींची माहिती देत सामंजस्याने वाद मिटविण्याचे प्रयत्न या द्वारे केले जाणार आहेत. यासाठी केवळ वकीलच नव्हे तर डॉक्टर, मनसोपचार तज्ञ यांचा समावेश असणार आहे. सध्या न्यायालयात नवी मुंबईतील एक हजार ८९७ केसेस असून हा वाद या सेंटर च्या माध्यमातून सुटावा हा आमचा उद्देश असल्याचे सेंटर च्या प्रमुख डॉ. अपर्णा जोशी यांनी सांगितलं.

# ज्येष्ठांची काळजी घेणारी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना'



मनः स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे त्यांचे ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना वयोमानपरत्वे भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर मात करुन त्याचे जीवनमान सुखकर करण्याकरिता राज्यातील 65 वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांकरिता 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या 11 कोटी 24 लाख असून त्यापैकी सद्यःस्थितीत 65 वर्षे व त्यावरील अंदाजे एकूण 1 कोटी 50 लाख ज्येष्ठ नागरिक आहेत. आज मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारपणाचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने सुरू केलेल्या योजनेच्या धर्तीवर दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) संबंधित दिव्यांग, दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे पुरविण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे.

योजनेचे स्वरुप:

- ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी- ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर आदी सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येणार आहेत. मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योगोपचार आदीचा लाभ घेता येईल.
- या योजनेकरिता राज्य शासनातर्फे 100 टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी 3 हजार रुपयांच्या लाभ देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक विभाग तसें राज्य शासनाद्वारे नोंदणीकृत योगोपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेता येणार आहे.

लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकषः

- ज्या नागरिकांची दि.31 डिसेंबर 2023 अखेर वयाची 65 वर्षे पूर्ण झाली आहेत, असे नागरिक या योजनेकरिता पात्र समजण्यात येतील.
- ज्या व्यक्तींचे वय 65 वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधारकार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधारकार्ड नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे.लाभार्थ्यांकडे आधारकार्ड नसल्यास ओळख पटविण्यासाठी इतर स्वतंत्र ओळख दस्तऐवजही ग्राह्य धरण्यात येणार येईल.
- लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न 2 लाख रुपयाच्या आत असणे आवश्यक असून याबाबत लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करावे.निवड किंवा निश्चित केलेल्या जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांच्या संख्येपैकी 30 टक्के महिला असणार आहे. अर्जदारांने मागील 3 वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे आदीच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.
- पात्र लाभार्थ्यांच्या बँकच्या खात्यात 3 हजार रुपये जमा झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे देयक तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र 30 दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर 30 दिवसांच्या आत अपलोड करावे.
- अर्जासोबत आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे 2 छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे योजनेचे लाभ घेण्यासाठी आवश्यक असणार आहे.

योजनेची अंमलबजावणी:-

- लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे आदी कामे नोडल एजन्सी, केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.
- लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरिता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
- ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीद्वारे लाभार्थ्याची निवड करण्यात येणार आहे.
- ही योजना वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्या दूर करून आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

65 वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 4था मजला, दत्तवाडी, स्वामी समर्थ मठासमोर, कळवा (प.), (दूरध्वनी क्रमांक 022-25341359 (ईमेल- acswothane@gmail.com) या पत्त्यावर सादर करावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी

# भिवंडी वाडा रस्ता दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेला जोडा

## खासदार सुरेश म्हात्रे यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेच्या भिवंडी-वाडा मार्गाशी थेट जोडणी आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर सविस्तर चर्चा केली.

भिवंडी-वाडा हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८४८ असून, औद्योगिक, व्यापारी आणि शेती क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवे अगदी जवळून जाऊनही यावर थेट प्रवेश उपलब्ध नाही, यामुळे स्थानिक नागरिक, व्यापारी, उद्योजक आणि शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. भिवंडी-वाडा मार्गाच्या केवळ ८ किमी अंतरावरून दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवे जात असतानाही थेट कनेक्टिव्हिटी नाही.

परिणामी, वाहतूक वळसा घालून तब्बल १८ किमीचा अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे, यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक नुकसान होत आहे.



भिवंडी शहरातील वाहतूक आधीच मोठ्या प्रमाणात वाढली असून, पर्यायी मार्गांचा अतिरेक झाल्याने वाहतूक कोंडी तीव्र झाली आहे. नागपूर, पुणे आणि पनवेलसारख्या महत्त्वाच्या मार्गांसाठी प्रवास अधिक वेळखाऊ व खर्चिक बनला आहे. कुडूस एमआयडीसीतील अनेक कंपन्या स्थलांतर करत असून, स्थानिक अर्थव्यवस्थेला फटका बसत आहे. शेतकऱ्यांना आपला माल बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी अतिरिक्त वेळ आणि खर्च सहन करावा लागत आहे.

यावर उपाय म्हणून भिवंडी-वाडा मार्गावर लामज गावाजवळून दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेवर थेट प्रवेशद्वार निर्माण करावे. रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व दुरुस्ती करून अत्याधुनिक वाहतूक सुविधा निर्माण करावी. नवीन इंटरचेंज तयार करून भिवंडी-वाडा मार्ग थेट एक्स्प्रेसवेने जोडावा, यामुळे वाहतूक वेगवान होईल आणि स्थानिकांसाठी सहज उपलब्धता निर्माण होईल असे खासदार सुरेश म्हात्रे यांनी सुचविले.

या निर्णयामुळे भिवंडी-वाडा औद्योगिक पट्टा वेगाने विकसित होईल, स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होईल. ५ हजारहून अधिक नवीन रोजगार संधी निर्माण होऊन स्थानिक तरुण आणि कामगारांना प्रत्यक्ष लाभ मिळेल. शेतकरी आपला माल वेगाने आणि किफायतशीर दरात बाजारपेठांमध्ये पाठवू शकतील, यामुळे त्यांना अधिक नफा मिळेल. भिवंडी शहरातील वाहतूक कोंडीला मोठा दिलासा मिळेल, रहिवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सोपा व सुलभ होईल. दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवेच्या माध्यमातून संपूर्ण भिवंडी-वाडा परिसराचा विकास झपाट्याने होईल. दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवे हा भारताच्या दळणवळण आणि औद्योगिक प्रगतीसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. भिवंडी-वाडा मार्गाच्या थेट जोडणीने हा संपूर्ण परिसर नव्या आर्थिक संधींना चालना देईल. याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत या विषयावर सकारात्मक आणि आशादायी चर्चा झाली असून, लवकरच आवश्यक निर्णय घेतला जाईल, असा विश्वास खासदार म्हात्रे यांनी व्यक्त केला आहे.

# भिवंडी महानगरपालिकेच्या अकिरा मियावॉकी (घनवन) प्रकल्प

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी: पर्यावरणाच्या दृष्टीने माझी वसुंधरा ५.० अंतर्गत अकिरा मियावॉकी (घनवन) प्रकल्प कॅच फाऊंडेशन, अहमदाबाद, गुजरात यांच्या विद्यमाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. ३ कार्यक्षेत्रातील स्थळ वऱ्हाळा तलावा लगत असलेले फेणे गांव पश्चिमेकडील उद्यान येथे उपलब्ध जागी घन वन जंगल प्रकल्पाचे उद्घाटन मा. श्री. अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त सो, भिवंडी मनपा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. भिवंडी शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पालिका प्रशासन कटिबद्ध असून त्यासाठी आकिरा मियावाकी घन वन जंगल प्रकल्प राबविले जात असून शहरातील हा चौथा प्रकल्प असून या माध्यमातून छोट्या जागेत तीन हजार वृक्ष लागवड केली जाणार आहे .त्यामुळे येथील नागरिकांना स्वच्छ हवेतील ऑक्सिजन मिळणार असून पक्षी मधमाशा फुलपाखर यांना हक्काचे निवासस्थान उपलब्ध होणार आहे असे प्रतिपादन भिवंडी पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे.



शहराच्या काँक्रीट जंगलात हिरवळ असलेले उद्यान शोधावे लागत आहे.त्यामुळे शहरातील ऑक्सिजनची गरज भागवणारे वन उभारणीची चळवळ जोर धरू लागली. आणि त्यासाठी जपानी मियावाकी पद्धतीचा अवलंब करून घन वन जंगल कमी जागेत उभारले जात आहेत. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात हफेले इंडिया प्रा लि.च्या सहकार्याने कॅच फाउंडेशन च्या माध्यमातून फेणेपाडा येथे 3 हजार झाडे लावून घनवन जंगल विकसित करण्यात येत असलेल्या या उद्यानात 70 विविध प्रजातीच्या फळ,फुल वनस्पती वृक्ष लागवड केली जाणार आहे.याआधी अशाच पद्धतीने तीन ठिकाणी प्रकल्प राबवण्यात आला आहे.

शहरात आता पर्यंत तीन मियावकी उद्यान विकसित करण्यात आले असून ही चौथे उद्यान उभारले जात आहे.ज्यामुळे शहरात पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल व येथील नागरिकांना विरंगुळा देणारे उद्यान विकसित होणारा आहे. विशेष म्हणजे या घनवन प्रकल्पाची तीन वर्षे जोपासना कॅच फाउंडेशन करणार आहे.शहरात 2 लाख वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून आता पर्यंत 50 हजार वृक्ष लागवड करण्यात आली असून,शहरात लवकरच बांबू लागवड प्रकल्प उभा केला जाणार आहे असे शेवटी आयुक्त अजय वैद्य यांनी सांगितले.

या प्रसंगी कॅच फाउंडेशनचे भरत सिसोदिया,अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त शैलेश दोंदे,रोहिदास दोरकुळकर,प्रा. डॉ.दिलीप काकविपुरे,उद्यान अधीक्षक निलेश संखे, कॅच फाउंडेशन व हफेले इंडिया प्रा लि.चे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केडीएमसी लिपिकास दिड लाखांची लाच घेताना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण :दिड लाखांची लाच घेतल्या प्रकरणी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बाजार परवाना विभागाच्या लिपिकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी सांयकाळी पावणेसातच्या सुमारास पालिका मुख्यालया नजीक असलेल्या चहाच्या टपारीवर रंगेहात अटक केली आहे. प्रशांत धिवर असे या अटक केलेल्या केडीएमसी कर्मचाऱ्याचे नाव आहे.

आरोपी प्रशांत याने तक्रारदाराच्या नावे असलेले मटण विक्री व कटाईचे लायसन हे त्यांचा मित्राच्या नावावर करण्यासाठी या कामाचे पेपर्स स्विकृत करुन काम करुन देण्याकरीता तक्रारदार यांच्याकडून दोन लाखाची लाच मागितली होती. तडजोडी अंती स्वत: करीता तसेच त्यांचे वरीष्ठ अधिकारी एएमसी, डीएमसी ठाकूर व तावडे यांच्याकरीता १ लाख ५० हजार रू लाचेच्या रक्कमेची मागणी करून हि लाचेची रक्कम सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्याकडून स्वतः स्विकारली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक संतोष अंबिके हे पुढील तपास करीत आहे.

दरम्यान कल्याण डोंबिवली मनपात लाचखोरीचे ग्रहण कधी सुटणार अशा चर्चा पलिका वर्तुळात यानिमित्ताने रंगल्या आहेत. तर अधिकाऱ्यांची नावे समोर आल्याने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा आयुक्त उगारणार का असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे.

# जिल्हा परिषदेचा सांस्कृतिक कार्यक्रम थांबविणाऱ्या पोलिसांसोबत पदाधिकाऱ्यांचे वाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : जिल्हा परिषदे तर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या सरस कार्यक्रमाच्या व्यासपीठावर जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मध्यरात्रीनंतर ध्वनीक्षेपक मोठ्या आवाजात सुरू असल्याने कार्यक्रम थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांसोबत जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी व सदस्यांसोबत वाद झाला.

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम गुरुवार (३० जानेवारी) रोजी सायंकाळी सहा वाजता सुरू होणार होते. मात्र प्रत्यक्षात हे कार्यक्रम सुरू होण्यास रात्रीचे ७३०-८ वाजले. जिल्हा परिषदेचे बहुतांश अधिकारी व कर्मचारी रात्री ११ वाजेपर्यंत आपापल्या घरी परतले. जिल्हा परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाळ १७ फेब्रुवारी रोजी संपत असल्याने अखेरच्या सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक सदस्य व पदाधिकारी नृत्य व मनोरंजन करण्यात गुंग होते.

# डिजीटल प्रणालीत रेल्वे अद्याप मागे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : देशातील आर्थिक व्यवहार डिजिटल करण्यावर केंद्र व राज्य सरकारने भर दिला आहे. मात्र देशभरात धावणारी रेल्वे डिजीटल प्रणालीत अद्याप काहीशी मागे आहे. तिकीट बुकींग प्रणाली डिजीटल झाली असली तरी विनातिकीट प्रवाशांकडून दंडांची रक्कम वसुली करण्यासाठी



अद्यावत प्रणाली अद्याप कार्यरत न झाल्याने त्रयस्थ व्यक्तीच्या नावे ही रक्कम जमा करण्याची नामुष्की रेल्वे प्रशासनावर आली आहे. यामुळे उद्भविलेल्या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी डिजिटल स्वरूपात व्यवहार केले जावे यासाठी केंद्र व राज्य सरकारने प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपक्रम राबविण्यास घेतले आहे. एकंदरीत पश्चिम रेल्वेच्या दंडवसुली प्रणालीतील कच्चे दुवे पालघरच्या प्रकारामुळे उघडकीस आले आहेत.

# असोळे येथील जळीत घराला आमदार किसन कथोरेंची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : - दोन दिवसापुर्वी असोळे येथील शंकर गवाळे व नामदेव गवाळे यांच्या राहत्या घराला दुपारच्या सुमारास अचानक आग लागून त्यांचे घर भस्मसात झाले आहे. राहते घर असल्याने घरासह घरातील सर्वसामान ,कपडालत्ता, खायचे अन्न धान्य संपूर्ण जळून खाक झाले आहे. सध्या हे कुटंब बेघर झाले असून त्यांच्यावर उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे. या कुटुंबाला शासनाकडून मदतीसाठी घटनेचा पंचनामा मुरबाड महसूल विभागाच्या वतीने





केला गेला असला तरी आज मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी असोळे गावात जाऊन जळीत घराची व गवाळे कुटुंबाची भेट घेऊन त्यांना आधार दिला.यावेळी आमदार कथोरे यांनी घराची पाहणी करून महसूल विभागाला प्रस्ताव लवकर पाठविण्याच्या सुचना दिल्या असुन जास्तीत जास्त मदत मिळण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी आमदार कथोरेंनी या कुटुंबाला दिले.

# डॉ. सुनील खर्डीकर 'कल्याण डोंबिवली आयकॉन पुरस्कारा'ने सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली येथील सावित्रीबाई फुले नाट्यगृह येथे "कल्याण डोंबिवली आयकॉन पुरस्कार" सोहळ्याचे आयोजन पुढारी वृत्तपत्राच्या माध्यमातून करण्यात आले. यावेळी कला, साहित्य, क्रीडा, राजकारण, समाजकारण, आणि उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. डॉ. सुनील खर्डीकर हे खर्डीकर क्लासेस चे संस्थापक असून मागील ३० वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असल्याने आज खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जातात. तसेच त्यांनी आतापर्यंत अनेक



विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवले आहे. खर्डीकर क्लासेस हा आता केवळ महाराष्ट्र राज्याकरिता मर्यादित राहिलेला नसून तो शहर पातळी पासून सुरू झालेला हा क्लास पुढे जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आता आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले नाव मोठे करू लागला आहे. गुजरात, तमिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, ओडिसा त्याचबरोबर दुबई अशा वेगवेगळया राज्य व देशातून १८ हजार हुन अधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्व बाबींचा विचार करून खर्डीकर क्लासेसला कल्याण डोंबिवली आयकॉन हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, भाजपाच्या आमदार सुलभा गायकवाड, शिवसेनेचे आमदार राजेश मोरे आणि कल्याण डोंबिवलीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षण हा माणसाला यशा कडे घेऊन जाणारा महामार्ग असून मी त्या महामार्गावरचा वाट दाखवणारा मार्गदर्शक असून खर्डीकर क्लासेस शैक्षणिक क्षेत्रात अशीच उल्लेखनीय कामगिरी करीत राहील अशा भावना खर्डीकर यांनी यावेळी व्यक्त केल्या.

# आमदार सुलभा गायकवाड यांचा नागरी सत्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वचे माजी आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना कल्याण पूर्वच्या पहिल्या महिला आमदार होण्याचा बहुमान मिळाला आणि रेकॉर्ड ब्रेक मतांनी निवडून आल्यामुळे दुर्गेश बागुल व भाजपा कल्याण पुर्व मंडल सरचिटणीस मा.ग्रामपंचायत सदस्य नितेश म्हात्रे यांच्या सौजन्याने शिव शंभू सेवा समितीच्या माध्यमातून भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तसेच आमदारांनी साईप्रसन्न कॉलनी येथे 100 मीमी व्यासाची पिण्याची 500 फुट पाईपलाईन स्वखर्चाने टाकून दिली.



यावेळी भव्य नागरी सत्कार कार्यक्रमाचे...

यासह प्रसंगी समिती अध्यक्ष शरद काळे, राजू सांगळे, स्वाती मुळीक, जयश्री सानप, दत्ता मोरे, अनिल साळुंखे (शिवसेना विभाग प्रमुख), रोहेशं शिरधनकर, आप्पा शेळके, दत्ता निकम, चुंनिलाल कुमावत, श्वेता गोळे, गौरी म्हस्के, स्वाती साबळे, राजेन्द्र काजरोलकर, दिपक सानप, किरण नागरे, अंधू म्हस्के, बबन पाटील, पूनम बागुल, सुनिता काळे व शेकडो कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.अत्यंत दिमाखदार पद्धतीने जेसीबी मधून फुलांचा वर्षाव करत जेसीबी ने हार घालत ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढून आमदार सुलभा गायकवाड यांचे स्वागत करण्यात आले. या नंतर 20 ते 25 रहिवासी सोसायटयातर्फे आमदारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना नितेश म्हात्रे यांनी मांडत संपूर्ण चिंचपड्याचा विकास करण्यासाठी माजी आमदार गणपत गायकवाड यांचे महत्तवपुर्ण योगदान असुन विकासाच्या जोरावरच आमदारांनी हि निवडणुक जिंकली व मतदारांनी पाठबळ दिले. कल्याण पूर्वच्या जनतेने दहशतीला नाकारत महिला शक्तीला साथ दिल्याचे आमदार सुलभा गायकवाड यांनी सांगितले. उपस्थितांचे आभार दुर्गेश बागुल यांनी मांडले व लाडू वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कल्याण पूर्वच्या जनतेने दहशतीला नाकारत महिला शक्तीला साथ दिली - आमदार सुलभा गायकवाड

# जुनी पेंशन योजनेसाठी मजदूर महासंघाची निदर्शने



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संरक्षण ऊद्योगातील कामगारांचे विविध समस्या, प्रश्न दिवसेंदिवस वाढत असून खाजगी करण व कंत्राटीकरण ईतर मोठ्या प्रमाणात आव्हाने आहेत. तसेच सरकारने युपीएस एनपीएस बंद करून जुनीच पेंशन योजना सुरु करावीत अशी मागणी हाय एनर्जी मटेलीयल रिसर्च लॅबोरेटरी सुतारवाडी पाषाण येथे झालेल्या निदर्शनांच्या वेळी भारतीय प्रतिरक्षा मजदूर महासंघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य महादेव हाके यांनी गेट मिटींगच्या वेळी केले आहे.

तसेच संरक्षण ऊद्योगातील आस्थापनां मध्ये मोठ्या प्रमाणात कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना रोजगारात सुरक्षा, लागु असलेल्या सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ, भविष्य निर्वाह निधी योजना, राज्य कामगार विमा योजना, वेतना मध्ये सुरक्षा मिळाली पाहिजे, अनेक ठिकाणी कंत्राटी कामगारांच्या वेतन मधून वेगवेगळया मार्गांनी काही कंत्राटदार पैसे काढून घेतात, कामगारांवर आर्थिक अन्याय केला जातो. त्यामुळे कामगारांनी एकजुटीने न्याय हक्कांच्या मागण्यांसाठी करिता भारतीय मजदूर संघ आवाज ऊठवणार आहे या करिता संघटीत व्हा असे आवाहन अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केले.

भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघाने 15 ते 30 जानेवारी या कालावधीत संपुर्ण देशभरातील संरक्षण ऊद्योगातील आस्थापनां समोर मागणी पंधरवडा च्या निमित्ताने निदर्शने करण्यात आली.

# कल्याण पंचायत समितीचे शिक्षणविस्तार अधिकारी दादू कोकाटे सेवानिवृत्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील शिक्षणविस्तार अधिकारी दादू शंकर कोकाटे हे तब्बल३९वर्षाची सेवा करून आज सेवानिवृत्त होत आहेत, या निमित्ताने पंचायत समितीच्या सभागृहात त्यांचा'सेवापूर्ती, सोहळा आयोजित केला होता, यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांनी स पत्नीक त्यांचा सत्कार केला व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सिध्दगड येथे जन्मलेले दादू शंकर कोकाटे यांनी मुरबाड, पालघर आणि कल्याण अशा ठिकाणी शिक्षक, केंद्रप्रमुख, आणि विस्तार अधिकारी अशा विविध पदावर काम केले, शांत, संयमी, निटनेटके पणा, वक्तशीरपणा आदी गुणामुळे त्यांना काम करत असताना कधी अडचणी आल्या नाहीत असे उपस्थित अनेकांनी सांगितले, तसेच अनेक शिक्षक, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, पत्रकार संजय कांबळे, यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या, कल्याण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी आर के भवारी ,हे



शुभेच्छा देताना म्हणाले की, श्री कोकाटे हे सादे सरळ, जीवन जगले, त्यांनी पुढील वेळ कुंटूबाला द्यावा असे सांगितले तर गटविकास अधिकारी संजय भोये यांनी सांगितले की, आपला शांत संयमी स्वभाव असाच घरीपण ठेवावा, आरोग्याची काळजी घ्यावी, त्यांची माझी दोन दिवसांची ओळख,प्रशासनात काम करताना अडचणी येतात, पण काम निटनेटके, नियमानुसार असेल तर त्रास होत नाही, याचे श्री कोकाटे उत्तम उदाहरण आहेत, त्यांची सेवा खूप मोठी आहे, त्यांची कामाप्रती आत्मियता व तळमळ शिकण्यासारखी असल्याचे बीडिओ संजय भोये यांनी सांगितले. यांप्रसंगी कल्याण पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षण विभागाचे अधिकारी व, कर्मचारी, सर्वशिक्षा अभिमान चे कर्मचारी उपस्थित होते.

# 'अटल' उपक्रमाला विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांना शिक्षणातील संधी आणि क्षमता ओळखण्यासाठी मदत व्हावी याकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सुरू केलेल्या 'अटल' उपक्रमाला विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत कल चाचणीसाठी घेण्यात येणाऱ्या सायकोमेट्रिक चाचणीसाठी २४३ विद्यार्थ्यांनी, तर सराव चाचण्यांसाठी २ हजार ५९५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा शोध घेता यावा यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने १६ जानेवारीपासून 'सीईटी-अटल' ही ऑनलाईन प्रणाली सुरू केली आहे. विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या 'अटल' उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे. बारावी व पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. सध्या हे विद्यार्थी बारावी व पदवीच्या परीक्षेची तयारी करण्यामध्ये व्यस्त आहेत. त्यामुळे कमी प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. मात्र परीक्षा संपल्यावर विद्यार्थी 'अटल' उपक्रमाला चांगला प्रतिसाद देतील, असा विश्वास राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून वर्तविण्यात येत आहे.

# उमपा आयुक्तांनी घेतला कचरा डेपोचा आढावा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर मधिल कचरा साठवणूक करणार्या डंपिंग ग्राउंड ची कमाल मर्यादा संपुष्टात आलीय. त्यामुळे कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आयुक्तांनी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी सूरू केलीय. नियम २०१६ अंतर्गत, अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (क्लस्टर) ची अंमलबजावणी एमएमआरडीए मार्फत सर्वेक्षण क्र. १८८ मौजे येथील ८.२ एकर जागेवर सुरू होत आहे. ही वालीवली बदलापूर येथे होतेय. उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त मनीषा आव्हाळे, अतिरिक्त आयुक्त डॉ किशोर गवस यांनी अलिकडेच या भूखंडाला भेट दिली. यावेळी एमएमआरडीएचे संबंधित अधिकारी व कंत्राटदार उपस्थित होते. प्रशासक व आयुक्तांनी सुरू असलेल्या मि कामाचा आढावा घेऊन संबंधितांना काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले

# आई नसलेल्या कुटुंबांचा कणा कमकुवत असतो - डॉ अरूणा राठोड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : मातृसत्ताक संस्कृतीच्या भारतात आई ही कुटुंबाच्या केंद्रस्थानी असते. निसर्गाने तिला एका जिवाला जन्म देण्यासोबत अनेक शक्तींचं वरदान दिलंय. ती आई, बहीण, पत्नी, शिक्षिका, मैत्रीण अशा नात्यांतून कुटुंब आणि पर्यायाने समाजाला घडवते. आई हा कुटुंबाचा कणा असतो. हा कणाच कमकुवत असेल तर कुटुंबं दिशाहिन होतात. आई नसलेल्या कुटूंबांचा कणा हा कमकुवत असतो. असे गौरवोद्गार सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अरुणा गणेश राठोड यांनी काढले.

त्या उल्हासनगर कॅंप नंबर ५ मधील जिजाऊ सावित्री रमाई प्रतिष्ठानचा वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक पुरस्कार - २०२५ हा पुरस्कार स्वीकारतांना पुरस्कारास उत्तर




देतांना बोलत होत्या. महिलांनी कुटुंबासाठी झटता झटता स्वतःच्या आरोग्याची ही काळजी घ्यायला हवी. नियमित व्यायाम, वैद्यकीय चाचण्या यासाठी स्वतःला वेळ दिला पाहिजे. आणि कुटुंबांनेही तिची काळजी घेतली तर उद्भवणार्या अनेक आजारांपासून तिला वाचवता येईल .

राष्ट्रमाता जिजाऊंनी स्वराज्याचं स्वप्न पाहिलं म्हणून शिवाजी महाराजांनी स्वराज्य घडवलं. ज्योतिबां मुळे सावित्रीबाईंनी

## जिजाऊ सावित्री रमाई पुरस्कारास भावुक उत्तर

महिलांना शिक्षणाची दालनं उघडी केली. तर या देशाच्या संविधान निर्मिती करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी रमाईंनी केलेले असीम त्याग आज समाजाने डोळयापुढे ठेवायला हवा. हा मोलाचा सल्ला त्यांनी यावेळी उपस्थित महिलांना दिला. प्रतिष्ठानचे मनोज शेलार व पूनम शेलार अशा पद्धतीने स्त्रियांच्या कर्तुत्वाची दखल घेतात हा नारीशक्ती चा मोठा गौरव आहे. असे ही कौतुक डॉ अरुणा राठोड यांनी केले.

यावेळी सन्मान स्विकारतांना त्यांचे पती रोटेरियन डॉ. गणेश राठोड देखील उपस्थित होते . याप्रसंगी जिजाऊ सावित्री रमाई प्रतिष्ठानच्या मनोज शेलार आणि पुनम शेलार यांनी वैद्यकीय सेवेकरीता डॉ.अरुणा राठोड यांच्यासोबत औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून हजारो महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी जयश्री देशमुख, शैक्षणिक क्षेत्राकरीता विजया पवार महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका वसुधा पवार, परखड पत्रकारिते करिता दै सकाळच्या पत्रकार मोहिनी जाधव, पोलीस क्षेत्रात रूपाली साळवे आणि रजनी भांबेरे यांनाही जिजाऊ सावित्री रमाई पुरस्कार -२०२५ ने गौरविले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन चौधरी, गणेश आठवले , रवी अहिरे, हरी शेलार , दिनेश हटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मीटर रिकॅलीब्रेशन बाबत रिक्षा चालक संतप्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मीटर रिकॅलीब्रेशन बाबत रिक्षा चालकांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल तसेच एआरटीओ विनोद साळवी यांना त्यांच्या दालनात समक्ष भेटून संघर्ष सेना ऑटो रिक्षा व भाजपा वाहतूक संघटना यांच्यावतीने संघर्ष सेना ऑटो रिक्षा युनियनचे ठाणे जिल्हा अध्यक्ष महेंद्र मिश्रा व भाजपा वाहतूक संघटनेचे अध्यक्ष विल्सन काळपुंड यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले.

कल्याण आरटीओ झोन मध्ये 50 ते 60 हजार



रिक्षा असून 700 ते 800 टॅक्सी आहेत व मीटर दुरुस्ती करणारे दहा ते पंधरा असून मीटर टेस्टिंग सेंटर फक्त एकच आहे. तसेच परिवहन विभागात मनुष्यबळही कमी आहे. असे असल्याकारणाने परिवहन विभागाने दिलेल्या दिनांक 30 एप्रिल 2025 पर्यंत ऑटोरिक्षा – टॅक्सीच्या इलेक्ट्रॉनिक मीटरचे रिकॅलीब्रेशन करणे शक्य नाही.

त्यामुळे रिक्षा टॅक्सी चालक यांनी ठाणे तसेच नवी मुंबई येथील टेस्टिंग सेंटर मधून मीटर रिकॅलीब्रेशन करून आणले तर ते कल्याण परिवहन विभागाने मान्य करावे व कल्याण आरटीओ झोन मध्ये अजून एक टेस्टिंग सेंटरला मान्यता देऊन लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावे आणि मीटर रिकॅलीब्रेशन करण्यासाठी 30 जून 2025 पर्यंत मुदतवाढ द्यावी अशी मागणी रिक्षा चालकांनी केली आहे.

मागील वेळी मीटर रिकॅलीब्रेशन करतेवेळी रिक्षा टॅक्सी चालकांना नाहक त्रासाला व दंडाला सामोरे जावा लागले होते. यावेळी ती परिस्थिती येऊ नये म्हणून परिस्थिती निर्माण होण्या अगोदरच निदर्शनात आणून दिली आहे. जर पुन्हा रिक्षा आणि टॅक्सी चालकांना निदर्शनात आणून दिलेल्या कारणांमुळे दंडाला सामोरे जावे लागले तर संघटनेच्या वतीने 1 मे 2025 पासून दंड माफ होत नाही तोपर्यंत उपोषण करण्याचा इशारा रिक्षा चालकांनी दिला आहे.

# खानिवली सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी मोतीराम वारघडे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील सात गांवामधुन शेकडो शेतकरी सभासद संख्या असलेल्या खानिवली गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी मोतीराम वारघडे यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

मावळते सभापती प्रवीण तुंगारे यांनी राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार निवडणूक अध्यासी अधीकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भिवंडी बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सोसायटीच्या सभागृहात घेण्यात आली यावेळी सभापती पदासाठी मोतीराम धोंडु वारघडे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. यावेळी १६ संचालकापैकी प्रकाश अंदाडे, शरद गोतारणे, अँड. शशीकांत गोतारणे, रवींद्र भोईर, उमेश वारघडे, गणपत जाधव, वैशाली पाटील, विठाबाई पारधी, बबन बराडे, मधुकर ठके, भगवान फर्डे, डॉं. विष्णू पारधी, प्रविण तुंगारे हे संचालक उपस्थीत होते. तर निवडणूक दरम्यान सचीव म्हणुन ज्ञानेश्वर (नंदकुमार) म्हात्रे यांनी काम पाहिले.

# माघी गणेशोत्सवात चोळेगांव तलाव बंद

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ऐन माघी गणेशोत्सवात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने ठाकुर्ली चोळेगांव तलाव अचानक उपसायचे आदेश काढले. यामुळे तलावातील पाणी उपसले असल्याने हा तलाव गणपती विसर्जनांसाठी बंद करण्यात आला आहे. यामुळे गणेश भक्तांची मोठी गैरसोय होणार असून याप्रकारानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक झाला असून जिल्हा प्रमुख दिपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली चोळेगांव तलावाजवळ जमत केडीएमसीचे पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे यांना जाब विचारला.

ठाकुर्ली आणि डोंबिवली पूर्वेत माघी गणपती विसर्जनासाठी व्यवस्था नसल्याने गणेशभक्त चोळेगांव तलावावर गणेशमुर्ती विसर्जनांसाठी





तलावातील पाणी उपसल्याने बाजूला कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्याची मागणी

येत असतात. त्यामुळे या गणेश भक्तांची होणारी गैरसोय लक्षात घेता, या बेजबाबदारपणासाठी जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने चोळेगाव तलाव येथे कल्याण डोंबिवली महानगरपालिके विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. दिपेश म्हात्रे यांनी याठिकाणी कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्याची मागणी केली. यांवर कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे यांनी याचे गांभीर्य लक्षात घेऊन याठिकाणी गणपती विसर्जनसाठी कृत्रिम व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले.

हिंदुत्वाचा नारा लावणाऱ्या प्रशासनाने गणेश भक्तांची अडचण करून दाखवली, ही केवळ बेजबाबदारपणाचीच नव्हे तर श्रद्धेवरील अन्यायाचीही परिसीमा आहे. सत्ताधाऱ्यांचे बेगडी हिंदुत्व असून निवडणुका संपताच या हिंदुत्वाच्या पुड्या बांधून खिशात ठेवल्या असल्याची टीका दिपेश म्हात्रे यांनी केली. यावेळी जिल्हा संघटक तात्या माने, अजय शेलार, शिवसेना उप जिल्हा प्रमुख राहूल भगत, शिवसेना शहर प्रमूख अभिजीत सावंत, युवासेना शहर प्रमुख प्रसाद ठूकुरुल, शाखा प्रमूख सचिन जोशी, मंदार गुरव, संजय मांजरेकर, सुधाकर वायकोळे, धनंजय चाळके स्थानीक पदाधिकारी शिवसैनिक युवा सैनिक उपस्थीत होते.

# वीज कंत्राटी कामगार संघाची देवेंद्र फडणवीसांसोबत बैठक लावणार

## - सुधीर मुनगंटीवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वीज कंत्राटी कामगारांच्या अनेक समस्यां राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री यांनी मीटिंग घेऊन सोडवल्या मात्र प्रत्यक्षात काही गंभीर समस्यां सुटल्या नसून कंत्राटदार व अधिकारी यांच्या हितसंबंधा मुळे कष्टकरी कामगार अडचणीत असल्याचे संघटना प्रतिनिधी यांनी लक्षात आणून दिल्यामुळे लवकरच भारतीय मजदूर संघाच्या वीज कंत्राटी कामगार संघाची राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत बैठक लावणार असल्याचे आश्वासन माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त राजेंद्र खेडकर यांच्या घरी सुधीर मुनगंटीवार आले असता संघटनेच्या वतीने प्रदेश अध्यक्ष निलेश खरात, रोहन पवार, विकास माने, पश्चिम महाराष्ट्र समरसता गतीविधीचे रवी ननावरे इत्यादी उपस्थित होते. उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकारी वर्गाने केली पाहिजे. शासन प्रशासना सोबत संवाद हवा संघर्ष नको अशी अपेक्षा अध्यक्ष निलेश खरात यांनी व्यक्त केली.




महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती च्या वतीने निगडी , पुणे येथे पत्रकारिता क्षेत्रातील मानाचा " आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भूषण " उत्कृष्ठ पत्रकारिता पुरस्कार २०२५", महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पारनेर तालुका सहसचिव , अँड . सोमनाथराव गोपाळे यांना आ . अमित गोरखे , पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे सर , प्रदेश संघटक संजयजी भोकरे सर , प्रदेश सचिव डॉ . विश्वासराव आरोटे सर , जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील , निघोज शहराध्यक्ष सचिनराव जाधव , सदस्य व दैनिक पारनेर समर्थ च्या कार्यकारी संपादक सौ . निलम खोसे पाटील इतर पदाधिकारी उपस्थित होते .

# साईधारात महाराज इंदुरीकर यांचे किर्तन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गालगत असणाऱ्या साईधारा लॉजेस्टीक पार्क भोईरगांव येथे प्रसिद्ध किर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

साईधारा लॉजेस्टीक पार्क येथील मुख्य प्रवेशद्वारावर असलेल्या प्रसिद्ध साईबाबा मंदीराचा ९ वा वर्धापन दिन कै. रामदास महाराज वाशेरे, ह. भ. प. केशव महाराज लाप यांच्या मार्गदर्शनाखाली साईधारा मेन्टेनन्सचे प्रमुख उद्योजक पद्माकर पांडुरंग भोईर यांच्या वतीने सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येणार असुन त्यामधे सकाळी साईबाबांची आरती, महाअभिषेक, गणेशपुजन, होम हवन, दुपारी महाप्रसाद व सायंकाळी त्रयलोक्य भजन मंडळ पाषाणे कर्जत यांचे संगीत भजन नंतर भोईरगांव व परीसर यांचे सामुदायिक हरिपाठ रात्री ८ ते १० या वेळेत सुप्रसिद्ध किर्तनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे समाज प्रबोधनपर सुश्राव्य किर्तन त्यानंतर महाप्रसाद असे आध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तरी परीसरातील हरीभक्तांनी, नांगरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मुरबाड तालुक्यात २७० माघी गणेशोत्सव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील टोकावडे व मुरबाड पोलिस ठाणे हद्दीतील जवळपास सार्वजनिक गणेश मूर्ती संख्या ६सार्वजनिक तर खाजगी गणपती संख्या २७० गणेश मूर्तींचे वाजत-गाजत प्रतिस्थापना करण्यात आले तर माघी गणेशोत्सवासाठी ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या नेतृत्वाखाली ठीक- ठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे अशी माहिती मुरबाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते व टोकावडे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दिनकर चकोर यांनी दिली आहे.

माघी गणेशोत्सवासाठी ठिकठिकाणी हरिपाठ, कीर्तन, प्रवचन, इत्यादी प्रबोधन कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत तसेच हा माघी गणेशोत्सव म्हणजे नवसाला पावणारा गणपती उत्सव म्हटला जात आहे त्यामुळे टोकावडे/मुरबाड नगरीत गणरायाचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

# स्टुडंटस फेडरेशनचे साखळी उपोषण स्थगित

## समस्या सोडविण्यासाठी प्रकल्प अधिकारी आर.बी. हिवाळे यांनी दिलेल्या लेखी आश्वासना नंतर अखेर या साखळी उपोषणाला स्थगिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : आश्रमशाळांमधील विविध सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या असलेल्या शैक्षणिक व आरोग्य या समस्या बाबत स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) या संघटनेच्या वतीने सुरू करण्यात आलेले साखळी उपोषण लेखी आश्वासना नंतर स्थगित करण्यात आले.

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडीया (एसएफआय) शहापूर तालुका समितीच्या वतीने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आश्रम शाळा, वसतिगृह सविधा व विद्यार्थ्यांच्या असलेल्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रकल्प कार्यालयाजवळ 31 जानेवारी




रोजी पासून बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात आले होते.

सदर, पहिल्याच दिवशी साखळी उपोषणातील शिष्टमंडळाला चर्चे साठी बोलावण्यात आले. परंतु सकारात्मक चर्चा न झाल्याने शिष्टमंडळ बाहेर आले. परंतु त्यानंतर पाच तासानंतर सायंकाळी झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन असलेल्या समस्या सोडविण्यासाठी प्रकल्प अधिकारी आर.बी. हिवाळे यांनी दिलेल्या लेखी आश्वासना नंतर अखेर या साखळी उपोषणाला स्थगिती देण्यात आली असल्याचे एसएफआयचे ठाणे - पालघर जिल्हाध्यक्ष भास्कर म्हसे यांनी म्हटले.

या आंदोलनाचे नेतृत्व एसएफआयचे ठाणे - पालघर जिल्हा अध्यक्ष भास्कर म्हसे, जिल्हा सचिव विरेंद्र दुमाडा, तालुका अध्यक्ष दिलीप बोंगे, जिल्हा सहसचिव नितिन कानल, तालुका सचिव मनान शेख, आनंद रोज, राहुल वलंबा, यदनेश गिंबल, पालक आदी कार्यकर्ते यांनी केले होते. तर या उपोषणाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तालुका सचिव कृष्णा भवर, आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच राज्य कमिटी सदस्य प्रकाश चौधरी,भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ नितिन काकरा, किसान सभेचे नंदू खंजोडे, जमस निकिता काकरा यांनी आंदोलन स्थळी उपस्थित राहून सक्रिय पाठिंबा दिला.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अँड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९१९०८२६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024